पुणे महानगरपालिका
शहर सुधारणा समिती
तहकूब सभा परिपत्र

शहर सुधारणा समितीची तहकूब सभा ( शुक्रवार दिनांक २८/९/२००७ रोजी कोरम अभावी तहकूब केलेली सभा) बुधवार दि. ३/१०/२००७ रोजी दुपारी ३:५५ (तीन पंचावन्न) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

सदर सभेत कार्यपत्रिका क्रं. २५, दि. २८/९/२००७ वरील विषय क्रं. २५१ ते २५४ चा विचार होईल.

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
शहर सुधारणा समिती
कार्यपत्रिका क्मांक २६

शहर सुधारणा समितीची साप्ताहिक सभा बुधवार दिनांक ३/१०/२००७ रोजी दुपारी ४:००(चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

विषय क्रं.२५५

मा. भिमराव तापकीर व सौ. मंगला मंत्री यांचे दि.२७/९/२००७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता (सिव्हिल) या पदाच्या एकूण मंजुर पदापैकी ५० टक्के जागा सरळसेवेने व ५० टक्के जागा पुणे महानगरपालिकेतील पात्र सेवकातून खाते अंतर्गत नेमणूका करणे व खाते अंतर्गत सेवकास कनिष्ठ अभियंता (सिव्हिल) या पदाकरीता कमीत कमी आवश्यक असणा-या शैक्षणिक पात्रतेचे निकष लावणे.

विषय क्रं.२५६

आरक्षित जागेचा टी.डी.आर. मा. शहर सुधारणा समिती व मा. मुख्य सभेच्या मान्यतेने देणेबाबतचे मा. अविनाश जाधव व मा. दिपक गावडे यांचे दि. १३/७/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १२४, दि. २०/७/०७ ला अनुसरून मा. महा.आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/४६१, दि.२४/९/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

विषय क्रं.२५७

विकास नियंत्रण नियमावलीतील एन २.४ नुसारचे टी.डी.आर इंडेक्सबाबतचे तरतुदीमध्ये फेरफार करणेबाबतचे मा. महा. आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/४६०, दि. २४/९/२००७ चे पत्र.

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका

**पुणे महानगरपालिका**
**शहर सुधारणा समिती**
**कार्यपत्रिका क्मांक २७**

**शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक १६/१०/२००७ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**विषय क्रं.२५८**

मा. पृथ्वीराज सुतार यांचे दि. २७/९/०७ चे पत्र.

पुण्यातील मार्केटयार्ड हे पूर्वी शहराच्या जवळ होते. ते आता पुण्याच्या झपाटयाने वाढत चाललेल्या लोकसंख्येमुळे शहराच्या मध्यभागी आलेले आहे. मार्केटयार्डाच्या चारही बाजूंनी प्रचंड रहिवासी इमारती व व्यापारी संकुले, वस्त्या झाल्या आहेत. त्यामुळे वाहतुकही फार मोठया प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे फार मोठे प्रदूषण होते. व वाहतुकीची कोंडी सुध्दा कायम होत असते पुणे शहराचे मार्केटयार्ड हे आपल्या देशातील प्रमुख मार्केटयार्ड म्हणून ओळखले जाते. त्यामुळे जगभरातून फळे, भाजीपाला येत असतो. या सार्वावरती या प्रदूषणाचा परिणाम होतो.

भविष्यात वाढणारी लोकसंख्या विचारात घेता मार्केटयार्ड परिसरामध्ये पर्यायाने पुणे शहरामध्ये वाहतुक फार मोठया प्रमाणात वाढून पुण्यातील नागरिकांचे जाणे-येणे जिकिरिचे होऊन पुणेकरांना फार मोठया अडचणींना तोंड द्यावे लागेल.

तरी महानगरपालिकेने या कामी तातडीने लक्ष घालून लवकरात लवकर पर्यायी जागा मार्केटयार्डसाठी उपलब्ध करून द्यावी.

**विषय क्रं.२५९**

मा. दिलीप बराटे यांचे दि. २७/९/०७ चे पत्र.

स.नं. ६५९, ६६० बिबवेवाडी राजीवगांधी नगर हा भाग ग.व.नि. घोषित करण्यात यावी

**विषय क्रं.२६०**

मा. सौ. शैलेजा खेडेकर व मा. दिपक गावडे यांचे दि. १/१०/२००७ चे पत्र.

पुणे मनपाच्या स्थापत्य खात्याकडे (सुतार, गवंडी, प्लंबर) इत्यादीसाठी दरवर्षी ॲप्रटिसशिप उमेदवारींची १ ते २ वर्षासाठी नियुक्ती केली जाते तसेच त्यांची ॲप्रेटिसशिपची मुदत संपल्यानंतर त्यांना मुक्त केले जाते.

पुणे मनपा हद्दीत वाढ झाल्याने मनपाच्या स्थापत्य खात्याकडील कामकाजांचे स्वरूप वाढले आहे. सदर काम करण्यासाठी कुशल कामगारांची अत्यंत आवश्यकता आहे. तथापि सदर जागा भरणेसाठी येणारा जाहिरातीचा खर्च तसेच नेमणूका होण्यास लागणारा विलंब यात बराच कालावधी जातो.

तरी वरील अपव्यअ टाळण्यासाठी (गवंडी,सुतार,प्लंबर) इत्यादी जागेसाठी ॲप्रेटिसशिप चांगल्या रितीने पूर्ण करणा-या उमेदवारांची गुणाक्रमे यादी करून त्यांची मनपात नेमणूका करण्यात यावी.

**विषय क्रं.२६१**

मा. सौ. शैलेजा खेडेकर व मा. दिपक गावडे यांचे दि. १/१०/२००७ चे पत्र.

पुणे मनपा तील वर्ग क्रं. ४ मधील विगारी (जागा-७०) फिल्डवर्क्स बिगारी (जागा-६०) फिल्डवर्कस्र गवत काएणारे बिगारी (जागा-५५) अशा एकूण १८५ जागांना महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रं. पीएमसी ३००२/२२१०७/प्र. क्रं. २२५, नवि.२२, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दि. २९ जुलै२००६ ने मान्यता दिली आहे. सदर जागा भरणेबाबत मनपातर्फे काहीही कार्यवाही करण्यात आली नाही.

तरी वरील जागा भरणेबाबत वर्तमान पत्रात जाहिरात देऊन वरील जागा तातडीने भरण्यात याव्यात.

**विषय क्रं.२६२**

मा. भिमराव खरात,मा. दिपक बोडके,मा. दत्तात्रय धनकवडे,मा. विनोद ओरसे यांचे दि.३/१०/०७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. १० मधील स.नं. ३७/१/२/१ खराउी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर झोपडपट्टी अनेक वर्षापासून अस्तित्वात आहे. त्याठिकाणी भरपूर प्रमाणात नागरिक रहात आहेत.

तरी वॉर्ड क्रं. १० मधील खराडी येथील स.नं. ३७/१/२/१ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील झोपडपट्टी ग.व.नि. घोषित करण्यात यावी.

<u>विषय क्रं.२६३</u>

मा. भिमराव खरात,मा. लक्ष्मण आरडे यांचे दि.५/१०/०७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ७ मधील झुंजारवस्ती स.नं. ३०/४ रामवाडी, नगररोड ही झोपडपट्टी सन १९८५ पासून अस्तित्वात आहे. सदर झोपडपट्टीत जवळ-जवळ १०० ते १२५ नागरिक राहतात. सदर झोपडपट्टी ग.व.नि घोषित नसल्याने त्याठिकाणी कोणत्याही प्रकारच्या नागरी सुविधा उपलब्ध नाहीत.

तरी सदर झोपडपट्टी ही ग.व.नि. घोषित करण्यात यावी.

<u>विषय क्रं.२६४</u>

मा. शंकरराव बेलदरे पाटील व मा. अनिल शिरोळे यांचे दि. ८/१०/०७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. १४४ आगम मंदिर येथील स. नं. ७२ दत्त नगर चौक ते स. नं. ८५ पुणे सातारा रस्ता पर्यंत हा रस्ता पुणे सिंहगड रोडला दळवीवाडी येथे मिळतो तरी भविष्यात हा रस्ता सोयीचा आणि आवश्यक असल्यामुळे सदरचा रस्ता १०० फुटी डी. पी. रस्ता आखण्यात यावा.

<u>विषय क्रं.२६५</u>

मा. शंकरराव बेलदरे पाटील व मा. अनिल शिरोळे यांचे दि. ८/१०/०७ चे पत्र.

दत्तनगर कात्रज आंबेगाव हा रस्ता ब्रिटीश काळापासून आहे. याभागात दत्तनगर आंबेगाव बु., आंबेगाव खुर्द, जाभुंळवाडी कोळेवाडी, न-हे, या भागामध्ये अंदाजे ३०,००० लोकसंख्या आहे. तरी हा रस्ता स.नं. ७३ जुना नविन स.,नं. १२६ कात्रज हा रस्ता मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गास १०० फुटी रस्ता कलम २०५ अन्वये आखण्यात यावा.

<u>विषय क्रं.२६६</u>

१) हेड मेटेनन्स सर्व्हेअर वर्ग-३ (वेश्रे.रू.५३००/- ते ११८००/- + मान्य भत्ते)

२) मेटेनन्स सर्व्हेअर वर्ग-३ (वेश्रे.रू.५०००/- ते १११२५/- + मान्य भत्ते)

३) अतिक्रमण निरिक्षक वर्ग-३ (वेश्रे.रू.४५००/- ते १००५५/- + मान्य भत्ते)या पदावर बढतीने नेमणूका करणेसाठी निवडयादीस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (ज) यांचे क्रं. मआ/सहमआ/से/५१२, दि. १०/१०/०७ चे पत्र.

<u>विषय क्रं.२६७</u>

पुणे पेठ संगमवाडी टी.पी.स्किम फा प्लॉट नं.१३२ येथील वौर्ड डिस्पेन्सरी साठी राखीव असलेल्या मिळकतीपैकी १०२०.५५ चौमी जागेचा आर्थिक दृष्टया दुर्बल असा वापर बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ९१ व ३७ अन्वये कार्यवाही करणेबाबतचे मा.महा. आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/३६४, दि. २७/८/०७ चे पत्र.

**(टिप : विषय क्रं. २६७ चा विचार १ महिन्यांनी करावा असे दि. ७/९/०७ च्या सभेत ठरले होते.)**

<u>विषय क्रं. २६८</u>

विकास अभियंता ( वे.श्रे. १०६५० ते २२१५० + मान्य भत्ते) या पदावरील नेमणूकीबाबतचे मा. महा. आयुक्त यांचे क्रं. मआ/सहआ/से/४१०, दि. ६/९/०७ चे पत्र.

<u>विषय क्रं. २६९</u>

पुणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावली मधीन अकोमडेशन आरक्षणे विकसित करणेच्या ॲपेडिक्स आर-७ मध्ये सुधारणा करणेसाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वयेची कार्यवाही करणेबाबतचे मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ-नअ-२४९,दि.६/७/०७ चे पत्र.

**(टिप : विषय क्रं. २६८ व २६९ चा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २१/९/०७ च्या सभेत ठरले होते.)**

<u>विषय क्रं.२७०</u>

विकास नियंत्रण नियमावलीतील एन २.४ नुसारचे टी.डी.आर इंडेक्सबाबतचे तरतुदीमध्ये फेरफार करणेबाबतचे मा. महा. आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/४६०, दि. २४/९/२००७ चे पत्र.

**(टिप : विषय क्रं. २७० चा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)**

<u>विषय क्रं.२७१</u>

मा. कर्णे गुरूजी, अध्यक्ष. शहर सुधारणा समिती व मा. अविनाश साळवे यांचे दि. १०/१० व०७ चे पत्र.

सर्व्हे क्रं. १०३ म. गांधीनगर व जयप्रकाशनगर येथे वाल्मिकी आंबेडकर योजनेतून ८० टक्के पक्की घरे झाली आहेत. वाल्मिकी आंबेडकर योजनेच्या जी.आर. नुसार सदर योजनेची ज्याठिकाणी अंमलबजावणी झाली आहे. त्याठिकाणी गृह सोसायटया करून घरे ज्यांचे त्यांचे नावे करून पट्टा चालू करण्याची तरतूद आहे.

तरी या आदेशानुसार वरील ठिकाणी वाल्मिकी आंबेडकर योजनेचे ८० टक्के  काम झाले आहे. तरी सदर घरे ज्यांचे त्यांचे नावे करून पट्टा चालू करण्यात यावा.

**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

# पुणे महानगरपालिका
## शहर सुधारणा समिती
## कार्यपत्रिका क्मांक २८

**शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक ६/११/२००७ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**विषय क्रं.२७४**

मा. सौ. रजनी त्रिभुवन व मा. सौ. रेखा टिंगरे यांचे दि. १९/१०/०७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ३८ मध्ये तरूणांना व्यायाम करण्यासाठी कुठेही व्यायामशाळा उपलब्ध नाही. त्यामुळे तरूण मुलांना व्यायाम करणेसाठी गैरसाय होत आहे.

तरी वॉर्ड क्रं. ३८ मध्ये पुणे मनपाच्या सावित्रीबाई फुले उद्यानात तरूणांना व्यायाम करणेसाठी व्यायाम शाळा बांधण्यात यावी.

**विषय क्रं.२७५**

मा. विकास मठकरी, विरोधी पक्षनेता व मा. निलेश निकम यांचे दि. २२/१०/०७ चे पत्र.

पुणे शहरात मेकॅनाईज्ड पार्किंग उभे करण्यासाठी व लोकप्रिय करण्यासाठी डिसी रूल्समध्ये पूढील दुरूस्ती करण्यात यावी. ओपन स्पेस १०% ऐवजी २०% करण्यात यावा. वाढीव १०% ओपन स्पेस मध्ये मेकॅनाईज्ड पार्किंग सक्तीचे करण्यात यावे. आणि वाढीव १०% ओपन स्पेस क्षेत्राचा एफ.एस.आय विकसकास देण्यात यावा. त्या मेकॅनाईज्ड पार्किंग मध्ये प्रत्येक टेनामेंट भाग १ कार प्रमाणे एकूण कार संख्येऐवढे पार्किंग उभे करण्यात यावे.

सदरचे पार्किंग हे अनुज्ञेय व्यतिरिक्त असावे.

**विषय क्रं.२७६**

मा. सुनिल बनकर व मा. दिलीप उंबरकर यांचे दि. २४/१०/२००७ चे पत्र.

पुणे शहर हे झपाटयाने वाढत चालले आहे. त्यात बिल्डरचे बांधकाम मोठया प्रमाणावर होत आहे. त्यात प्लॉट घेणारे मध्यम वर्गीय असतात. त्यांनाप्लॉट घेताना बिल्डरकडून संपूर्ण माहिती व्यवस्थित दिली जात नाही.

१)सध्या पुण्यातील बिल्डर ग्राहकांकडून (अ) पार्किंगचे पूर्ण पैसे घेतात अंदाजे किंमत १ ते दिड लाख.

२) टेरेसचे ५०% रेट घेतात अंदाजे २००० ते २५०० या दराप्रमाणे

३) काही बिल्डर टेरेस सुध्दा २५% दराने विकतात (अंदाजे २००० ते २५००)

४) बिल्डर प्लॉट विकताना कारपेट एरियाने न विकता बिल्ड टप एरियचाने विकतात. पुणे मनपाने त्यांना बंधनकारक करून बांधकाम जी.ई (अभियंता) मार्फत कारपेट एरियाचे माप घेऊन बंधनकारक करावे. व कुठलाही प्लान कारपेट मंजूर करावा.तसेच बाल्कनीचे एरिया प्लॉट मध्ये समविष्ठ करून तो सेलेबस एरिया म्हणून विकतात. तसे न करता मनपाने जनतेचे नुकसान न करता या एरियावर बंधन घालून नियमावली तयार करण्यात यावी. तसेच ते प्लॉट कारपेट एरियानेच विकणेकरिता नियमावली करण्यात यावी.

**विषय क्रं.२७७**

मा. अंकुश तिडके यांचे दि. २६/१०/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ६० कोथरूड पौड कचरा डेपो याठिकाणी मनपाची ४० गुंठे मोकळी जागा असून याठिकाणी आसपास भाजी मंडई नाही. तरी सदर मनपाच्या मोकळया जागेत चांगल्या सोयीयुक्त भाजी मंडई बांधण्यात यावी.

**विषय क्रं.२७८**

मा. अंकुश तिडके यांचे दि. २६/१०/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ६० कोथरूड पौड कचरा डेपो हया ठिकाणी मनपाची ४० गुंठे मोकळया जागेत नागरिकांच्या सोयीसाठी व्यायामशाळा बांधण्यात यावी.

**विषय क्रं.२७९**

पुणे महानगरपालिका हद्दीबाहेर ऊरूळी कचरा डेपो येथील मंतरवाडी गावातील अंतर्गत रस्ते करणेसाठी र.रूपये ८,२०,०००/- चे पूर्वगणनपत्र. मान्य करणेबाबत मा.अति. महा.आयुक्त (ज) यांचे क्रं.मआ/उआ (वि.का.क्रं. ४)/५२२, दिनांक १२/१०/०७ चे पत्र.

**विषय क्रं.२८०**

मनपा प्रशासनाकडील कनिष्ठ अभियंता (सिव्हिल) (एकवट वेतन प्रथम वर्ष रू. ४५००/- व्दितीय वर्ष रूपये ५०००/- तृतिय वर्ष रू. ५५००/- द.म. तीन वर्षाचे समाधानकारक सेवेनंतर समय वेतनश्रेणी रू. ५५०० ते ९००० + मान्य भत्ते) या हुद्याच्या रिक्त जागा भरणेबाबत मा. महा. आयुक्त यांचे क्रं. मआ/सहआ/से/५२६, दि. १६/१०/०७ चे पत्र.

**विषय क्रं.२८१**

वॉर्ड क्रं. ७ लोहगांव स.नं. १४६ व १४८ (पै) येथील गार्डनचे आरक्षण रद्य करणेबाबतचे मा. भिमराव खरात व मा. ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि. २०/७/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १३५, दि. २७/७/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/५५३, दिनांक २०/१०/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.२८२**

वॉर्ड क्रं. ७ लोहगांव खुळेवाडी स.नं. १४८ व १४७ मधून ९.० मी. रूंदीचा कलम२०५ चा रस्ता आखणेबाबतचे मा. भिमराव खरात व मा. किरण बारटक्के यांचे दि. ४/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ५७, दि. ८/६/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/५५४, दिनांक २०/१०/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.२८३**

पुणे पेठ वानवडी स.नं. ८/९ येथील उद्यान आरक्षणाची जागा निवासी विभागात समाविष्ट करणेबाबतचे मा. अभिजित शिवरकर, मा. सौ. मंगला मंत्री व मा. नितीन जगताप यांचे दि. ९/५/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३०, दि. १८/५/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/५६८, दिनांक २०/१०/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.२८४**

पुणे पेठ वानवडी स.नं. ६३ हि.नं. ४ व ५ मधून ४० फुटी डी.पी. रस्ता रद्य करणेबाबतचे मा. सौ. रत्नप्रभा जगताप व मा. संदिप लडकत यांचे दि. २५/४/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. २१, दि. ९/५/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/५६७, दिनांक २०/१०/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.२८५**

वॉर्ड क्रं. ३९ येथील जहांगीर हॉस्पिटल चौकात जवाहरलाल नेहरू नागरी पुन:निर्माण योजने अंतर्गत निधीतून उड्डाण पूल बांधणेबाबतचे मा. सौ. चाँदबी नदाफ यांचे दि. १/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १६२, दि. १०/८/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/जनेयो /५७१, दिनांक २२/१०/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. २८६**

सहाय्यक अभियंता (सिव्हील/विद्यूत) ( वे.श्रे. ६५०० ते १०५०० + मान्य भत्ते) या पदावरील बढतीच्या नेमणूकीबाबतचे मा. महा. आयुक्त यांचे क्रं. मआ/सहआ/से/५७४, दिनांक २२/१०/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. २८७**

पुणे पेठ घोरपडी वॉर्ड क्रं. ४४ मधील स.नं. ५२/३२ भगवान तात्याबा कवडे रोडला जाणारा रस्ता मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम २०५ अन्वये ८० फुट आखणेबाबतचे मा. सौ. पार्वती भडके व मा. सुनिल गोगले यांचे दि. १२/७/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १२३, दि. २०/७/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/५७६, दिनांक २३/१०/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.२८८**

बकरी हिल येथे टाकीलगत १ कोटी लिटर्स क्षमतेची नविन साठवण टाकी बांधणेबाबतचे मा. अभिजित शिवरकर, मा. राजेंद्र काची, मा. लक्ष्मण आरडे, मा. शिवाजी शिंदे यांचे दि. २१/५/०७ च्या पत्रावर

झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ४१, दि. २५/५/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/पापु/प्र//५८७, दिनांक २४/१०/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.२८९**

तुकाई टेकडी (हडपसर) येथे स.नं. ३५ याठिकाणी ८० लाख लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी बांधणेबाबतचे मा. सुनिल बनकर व मा. चेतन तुपे यांचे दि. १३/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ७३, दि. २२/६/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/पापु/प्र /५८८, दिनांक २४/१०/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.२९०**

रामटेकडी येथे १ कोटी लिटर्स क्षमतेची नविन साठवण टाकी बांधणेबाबतचे मा. अभिजित शिवरकर, मा. राजेंद्र काची, मा. लक्ष्मण आरडे, मा. शिवाजी शिंदे यांचे दि. २१/५/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ४३, दि. २५/५/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/पापु/प्र/५८९, दिनांक २४/१०/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.२९१**

मा. सागर माळकर व मा. शाम देशपांडे यांचे दि. ३१/१०/०७ चे पत्र.

येरवडा परिसरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी सादलबाबा दर्गा ते गुंजन टॉकिज दरम्यान जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत नव्याने उड्डान पुल तयार करण्यात यावा.

या परिसरात विमानतळ असून अनेक महत्वाच्या व्यक्ती या रस्त्यावरून जा-ये करतात. तसेच राष्ट्रकुल युवक स्पर्धा होणार असल्याने परदेशी पाहुणे मोठया प्रमाणावर शहरात येणार आहेत. त्यासाठी वाहतुकीचे नियोजन तातडीने करणे गरजेचे आहे. यासाठी सदर उड्डान पुलाची अत्यंत आवश्यकता आहे. तरी सादलबाब दर्गा ते गुंजन टॉकिज दरम्यान नव्याने जे.एन.एन.एम.आर.एम. अंतर्गत उड्डान पुल करण्यात यावा.

**विषय क्रं. २९२**

पुणे पेठ संगमवाडी टी.पी.स्किम फा प्लॉट नं.१३२ येथील वौर्ड डिस्पेन्सरी साठी राखीव असलेल्या मिळकतीपैकी १०२०.५५ चौमी जागेचा आर्थिक दृष्टया दुर्बल असा वापर बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ९१ व ३७ अन्वये कार्यवाही करणेबाबतचे मा.महा. आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/३६४, दि. २७/८/०७ चे पत्र.

**विषय क्रं.२९३**

पुणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावली मधीन अकोमडेशन आरक्षणे विकसित करणेच्या ॲपेडिक्स आर-७ मध्ये सुधारणा करणेसाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वयेची कार्यवाही करणेबाबतचे मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ-नअ-२४९,दि.६/७/०७ चे पत्र.

**(टिप : विषय क्रं. २९२ व २९३ चा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**
**शहर सुधारणा समिती**
**कार्यपत्रिका क्मांक २९**

**शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक २०/११/२००७ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**विषय क्रं.२९४**

मा. शंकर केमसे व मा. पृथ्वीराज सुतार यांचे दि. ३/११/०७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ६१ वेदभवन मधील चांदणी चौकापुढे पुणे मनपाचे हद्यतील पौड रोड बावधान येथे होत असलेला टोलनाका हद्यीच्या बाहेर करण्यात यावा.

असंख्य नागरिक व ज्येष्ठ नागरिक तेथील रहिवाशी येथेच टोल नाका झाल्यामुळे त्यांची गैरसोय होणार आहे. तरी तो मनपाचे हद्यीच्या बाहेर जकात नाक्याचे पुढे कोठेही करावा.

**विषय क्रं. २९५**

हॉर्टीकल्चरल सुपरवायझर वर्ग ३ दरमहाचे एकवट वेतन रूपये प्रथम वर्षी रू. ५०००/- व्दितीय वर्षी ५५००/- तृतीय वर्षी रू. ६०००/- (वे.श्रे.रू. ५००० ते ८०००/- + मान्य भत्ते ) या हुद्याची खुला गटाची जागा भरणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (ज) यांचे क्रं. मआ/सहआ/से/५२७, दि. १६/१०/०७ चे पत्र.

**विषय क्रं.२९६**

हडपसर येथील ग्लायडिंग सेंटर लगत तुकाई टेकडीवर नविन वॉटर वर्क्स (जलकेंद्र) बांधणेबाबत. मा. अभिजित शिवरकर, मा. राजेंद्र काची, मा. लक्ष्मण आरडे व मा. शिवाजी शिंदे यांचे दि. २१/५/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा ठराव क्रं. ४२, दि. २५/५/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/पापु/६०६, दि. २/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.२९७**

पुणे पेठ बिबवेवाडी स.नं. ६३५(पा) ही मिळकत प्ले ग्राऊंड ऐवजी ड्राफ्ट डी.पी. नुसार गार्डनसाठी आरक्षित करणेबाबत. मा. सुनिल बिबवे व मा. भिमराव खरात यांचे दि. ५/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा ठराव क्रं. ६३, दि. २२/६/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/६०७, दि. २/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.२९८**

मान्य विकास आराखडयातील क्रिडांगण, बाल क्रिडांगणे, पार्क, उद्यान या आरक्षणात बेसमेंट अनुज्ञेय करणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/६०९, दि. २/११/०७ चे पत्र.

**विषय क्रं.२९९**

ज.ने.रा.श.पु.अ. व राष्ट्रकूल युवा स्पर्धा अंतर्गत रस्ते विषयक कामाचे र.रू. १४६२.९१ कोटीचे पुर्वगणनपत्र मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/विका(तां.सं.)/ ज.ने.रा.श.पु.अ./६१४, दि. २/११/०७ चे पत्र.

**विषय क्रं.३००**

पुणे पेठ घोरपडी गाव स.नं. ७४/३/१ या ठिकाणी कलम २०५ अन्वये रस्ता आखणेबाबतचे_मा.दत्तात्रय धनकवडे व मा. दिपक बोडके यांचे दि. २३/७/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा ठराव क्रं. १३८, दि. २७/७/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/६५१, दि. ३/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.३०१**

उरूळी कचरा डेपो येथे ऑफिस शेड व वॉचमन शेडचे नुतनीकरण करणे व रस्ते कॉक्रिटींग करणे आणि चेनलिंक फेनसिंग करणेबाबत मा.अति.महा. आयुक्त(ज)यांचे क्रं. मआ/उआ/(वि.का.क्रं.४)/६५२, दि.३/११/०७ चे पत्र.

**विषय क्रं.३०२**

पुणे पेठ महर्षि कर्वेनगर स.क्रं. ५४ ते स.क्रं. १० एन.डी. रस्ता ते गल्ली क्रं. ११ पर्यत कलम २०५ अन्वये ५० फुट रस्ता आखणेबाबत मा.शिवराम मेंगडे यांचे दि. २६/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ९५, दि. ६/७/०७. मा. स्थायी समिती ठराव क्रं. ३७५, दि. १२/६/२००७ व ठ.क्रं. ५४५, दि.७/८/०७ चे पत्र. मा. अति.महा.आयुक्त (वि)तथा अध्यक्ष २०५ रस्ता समिती यांचेडील दि. १५/१०/०७ ची मान्यतेला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६५३, दिनांक ३/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.३०३**

लोहगांव स.नं. २३४मधून अंतर्गत रस्ते १८ मी. कलम २०५ आखलेल्या रस्त्यापासून लोहगांव रस्त्यापर्यत वहिवाटी नुसार झालेला अंदाजे ९.० मी. रूंदीचा कलम२०५ चा रस्ता आखणेबाबतचे मा. आरिफ बागवान यांचे दि. १६/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १८९, दि. १७/८/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/ नअ/६२२, दिनांक ३/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३०४**

वॉर्ड क्रं. ७ लोहगांव विमानतळाकडे यमुनानगर झोपडपट्टी (विमाननगर) या ठिकाणी सन १९८७ च्या आराखडयात हॉस्पिटलचे आरक्षण आहे. परंतु सदरची झोपडपट्टी घोषित असल्याने हॉस्पिटलचे आरक्षण रद्य करणेबाबत मा. भिमराव खरात व मा. ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि. २०/७/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १३६, दि. २७/७/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/६२३, दिनांक ३/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३०५**

वॉर्ड क्रं. ७ लोहगांव विमानतळ या वॉर्डात मारिया उद्यान ते स.नं. १०५ मध्ये २ अंतर्गत रस्ते कलम २०५ अन्वये आखणेबाबत मा. भिमराव खरात व मा. शैलेश चरवड यांचे दि. १८/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १९१, दि. २४/८/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/६२४, दिनांक ३/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.३०६**

वॉर्ड क्रं. ७ लोहगांव विमानतळ या वॉर्डात स.नं. १६४ मधून राजीव गांधी नगर येथे नागरिकांच्या सोयीसाठी कलम २०५ अन्वये रस्ता आखणेबाबतचे मा. भिमराव खरात व मा. शैलेश चरवड यांचे दि. १८/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १९२, दि. २४/८/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/६२५, दिनांक ३/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३०७**

वॉर्ड क्रं. ७ लोहगांव विमानतळ या वॉर्डात स.नं. १६६ ते १६२ याठिकाणी नागरिकांना जाण्या-येण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्याने अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे कलम २०५ अन्वये १४० फुटी लांब व ३० फुट रुंद रस्ता आखणेबाबतचे मा. भिमराव खरात व मा. सुनिल गोगले यांचे दि. २२/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १९९, दि. ७/९/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/६२६, दिनांक ३/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३०८**

वॉर्ड क्रं. ७ लोहगांव विमानतळ येथे स.नं. १६६ ते १६३ गुरूव्दारा वस्ती याठिकाणी नागरिकांना जाण्या-येण्यासाठी कलम २०५ अन्वये १६० फुट रस्ता आखणेबाबतचे मा. भिमराव खरात व मा. श्रीकांत पाटील यांचे दि. १७/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १९०, दि. २४/८/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/६२७, दि.३/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३०९**

वॉर्ड क्रं. १४४ (आगम मंदिर) दत्तनगर, स.नं. ४० ही जागा म.न.पा. च्या मालकीची असून सदर जागेचा वापर म.न.पा.ने केल्यास भविष्यात त्याजागेवर झोपडपट्टी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या साठी

या जागेचा वापर हा म.न.पा. हॉस्पिटल, शाळा आणि भाजी मंडई या साठी आवश्यक ती आरक्षणाची कार्यवाही करणेबाबतचे मा. शंकरराव बेलदरे व मा. सुनिल बनकर यांचे दि. ११/७/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ११९, दि. २०/७/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६६२, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३१०**

वॉर्ड क्रं. १४४ (आगम मंदिर) दत्तनगर, स.नं. ३९ आंबेगाव बुाा येथील म.न.पा.च्या जागेमध्ये उद्यान व जॉगिंग ट्रॅक साठी आरक्षणाची कार्यवाही करणेबाबत मा. शंकरराव बेलदरे व मा. सुनिल बनकर यांचे दि. ११/७/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १२०, दि. २०/७/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६६३, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.३११**

बाणेर स.नं. ७ व ४९ येथे (बायोडाव्हार्सिटी पार्क) या टेकडीवर बाणेर गावठाणातून म.न.पा. शाळा क(. १५१ बी लगतच्या रस्त्यापासून सि.स.नं. ३१ व ३२ च्या पूर्व बाजुने काही भागात ३० फुटी रूंदीचा रस्ता कलम २०५ अन्वये आखणेबाबत मा. बाबुराव चांदेरे व मा. सागर माळकर यांचे दि. १४/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ७६, दि. २२/६/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६६४, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.३१२**

स.नं. ६१ मधून कात्रज स.नं. १८ मधील डी.पी. रस्त्यास मिळण्यासाठी कलम २०५ नुसार रस्ता आखण्याबाबत मा. सौ. रंजना टिळेकर व मा. सौ. मुक्ता टिळक यांचे दि. १/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ५३, दि. ८/६/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ /६६५, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.३१३**

वॉर्ड क्रं. १४४ मध्ये स.नं. ४० मध्ये जाणारा रस्ता कलम २०५ अन्वये तयार करून दत्तनगर आंबेगाव या रस्त्यास जोडणेबाबत मा. शंकरराव बेलदरे व मा. विशाल तांबे यांचे दि. २२/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १९७, दि. ७/९/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६६६, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.३१४**

वॉर्ड क्रं. ९६ महमंद वाडी याठिकाणी स.नं. १२/१२/१३ येथून स.नं. ३९ मरीआई गेट मंदिरापर्यंत कलम २०५ अन्वये ६० मीटर रस्ता आखणेबाबत मा. प्रमोद उर्फ नाना भानगिरे व मा. सागर माळक यांचे दि. १३/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १७८, दि. १७/८/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६६७, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३१५**

धनकवडी स.नं. ७ व ८ यांना जोडणारा दक्षिणउत्तर रस्ता व सध्या वापरातील रस्ता नागरिकंसाठी २०५ कलम नुसार आखणेबाबत मा. संजय नांदे व मा. शैलेद्र नलावडे यांचे दि. २२/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ८५, दि. २९/६/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६६८, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३१६**

धानोरी स.नं. ५१ भैरवनगर येथील म.न.पा. शाळा क्रं.१५६ बी येथील ओपन स्पेस मधून कलम २०५ अन्वये १५ फुटी रस्ता आखणेबाबत मा. सौ रेखा टिंगरे यांचे दि. १२/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ७५, दि. २२/६/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६६९, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३१७**

वॉर्ड क्रं. ९६ महंमदवाडी याठिकाणी स.नं. १६,१९,२० या मोकळया जागेवर जॉगिंग ट्रॅकचे आरक्षण टाकून जॉगिंग ट्रॅक विकसित करणेबाबत मा. प्रमोद उर्फ भानगिरे व सागर माळकर दि. १३/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १७६, दि. १७/८/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६७०, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३१८**

वॉर्ड क्रं. १४३ भारती विद्यापीठ परिसरात धनकवडीचा काही भाग आंबेगावचा काही भाग या भागावर ३३ (लोवॉटर झोन) चे आरक्षण आहे तरी सदरचे आरक्षण रद्य करून त्याठिकाणी निवासी झोन करणेबाबत मा. संतोष फरांदे व मा. सुरेश शेवाळे यांचे दि. २९/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. २१०, दि. ७/९/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६७१,दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३१९**

वॉर्ड क्रं. ९६ महंमदवाडी याठिकाणी स.नं. ४४ या ठिकाणी मोकळया असलेल्या जागेवर उद्यानाचे आरक्षण टाकून उद्यान विकसित करणेबाबत मा. प्रमोद उर्फ भानगिरे व सागर माळकर दि. १३/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १७७, दि. १७/८/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६७२, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३२०**

वॉर्ड क्रं. ९६ महंमदवाडी याठिकाणी स.नं.२ या ठिकाणी मोकळया जागेवर क्रिडांगणाचे आरक्षण टाकून क्रिंडागण विकसित करणेबाबत मा. प्रमोद उर्फ भानगिरे व सागर माळकर दि. १३/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १७९, दि. १७/८/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६७३, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३२१**

स.नं.३ कोंढवा (बु) येथून मुख्य रस्त्याने स.नं. ४ मध्ये जाणारा २४.०० मीटर रस्त्यास जोडणारा कलम रस्ता २०५ नुसार रस्ता आखण्याबाबत मा. सौ. रंजना टिळेकर व मा, सौ. मुक्ता टिळक यांचे दि. १/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ५५, दि. ८/६/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६७४, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३२२**

वॉर्ड क्रं. १४४ मध्ये स.नं.३९,४० मधून जाणारा रस्ता कलम २०५ अन्वये तयार करून मुंबई बेंगलोर महामार्गास जोडणेबाबत मा. शंकरराव बेलदरे पाटील व मा. विशाल तांबे यांचे दि. २२/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १९८, दि. ७/९/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६७५, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३२३**

वॉर्ड क्रं. १३० व १३१, स.नं.४३ मधील जाधव (बगंला) ते सिंहगड कॉलेज रोडला जोडण्यासाठी रस्ता आखणेबाबत मा.विकास दांगट व मा. शैलेश चरवड यांचे दि. ३/९/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. २१२, दि. ७/९/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६७६, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३२४**

कोंढवा (बु) स.नं.१ मधून स.नं. ६६मार्गे गंगाधाम शंत्रुजय मंदिर रस्त्यास जाणारा रस्ता २०५ कलम नुसार १२.०० मीटर आखणेबाबत मा. सौ. रंजना टिळेकर व मा, सौ. मुक्ता टिळक दि. १/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ५४, दि. ८/६/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/६७७, दिनांक ५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३२५**

सहाय्यक अतिक्रमण निरिक्षक पदावरील नेमणूकांचे दिनांक विचारात घेवून सेवाज्येष्ठता यादी तयार करावी व त्यानुसार हेड मेटेंनन्स सर्व्हेअरच्या बढतीच्या जागा रोस्टर पॉईंट व सेवाज्येष्ठतेनुसार भरण्यात याव्यात याबाबत मा.दिपक गावडे व मा. सौ. दिपाली ओसवाल, यांचे दि. २१/९/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. २५३, दि. ३/१०/०७ ला अनुसरून मा. अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे पत्र क्रं. मआ/सहआ/से/६८३, दि. ६/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३२६**

बिबवेवाडी स.नं. ६५९(पार्ट),६६०(पार्ट), या स्टील यार्ड(एस.वाय.-१) साठी आरक्षित जागेबाबत मा. सौ. दिपाली ओसवाल, व मा. डॉ. पुजा यादव यांचे दि. ६/७/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ११३, दि. १३/७/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्रं. मआ/नअ/से/६९६, दिनांक ६/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**<u>विषय क्रं. ३२७</u>**

पुणे पेठ संगमवाडी येथील सादलबाबा दर्ग्याकडे जाणारा ३०.० मी. रुंदीचा डि.पी.रस्त्याच्या प्रमाण रेषेमध्ये येणारी नागरिकांची घरे वाचविणेसाठी बदल करण्यात यावा. हा रस्ता दक्षिणेकडून ३० मी. स्थलांतरीत करणेत यावा.यासाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वये गौण फेरफाराची कार्यवाही सुरु करण्यात मा.अनिल भासेले, सभागृहनेते, मा.विकास मठकरी, विरोधी पक्षनेते, मा.शाम देशपांडे यांचे दि.१/६/२००७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ५६, दि. ८/६/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्रं. मआ/नअ/से/७०८, दिनांक ७/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**<u>विषय क्रं. ३२८</u>**

पुणे पेठ संगमवाडी टी.पी.स्किम फा प्लॉट नं.१३२ येथील वॉर्ड डिस्पेन्सरी साठी राखीव असलेल्या मिळकतीपैकी १०२०.५५ चौमी जागेचा आर्थिक दृष्टया दुर्बल असा वापर बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ९१ व ३७ अन्वये कार्यवाही करणेबाबतचे मा.महा. आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/३६४, दि. २७/८/०७ चे पत्र.

**<u>विषय क्रं.३२९</u>**

पुणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावली मधीन अकोमडेशन आरक्षणे विकसित करणेच्या ॲपेडिक्स आर-७ मध्ये सुधारणा करणेसाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्चयेची कार्यवाही करणेबाबतचे मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ-नअ-२४९,दि.६/७/०७ चे पत्र.

**<u>विषय क्रं.३३०</u>**

पुणे महानगरपालिका हद्दीबाहेर ऊरूळी कचरा डेपो येथील मंतरवाडी गावातील अंतर्गत रस्ते करणेसाठी र.रूपये ८,२०,०००/- चे पूर्वगणनपत्र. मान्य करणेबाबत मा.अति. महा.आयुक्त (ज) यांचे क्रं.मआ/उआ (वि.का.क्रं. ४)/५२२, दिनांक १२/१०/०७ चे पत्र.

**(टिप : विषय क्रं. ३२८ व ३३० चा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

पुणे महानगरपालिका
शहर सुधारणा समिती
तहकूब सभा परिपत्र

शहर सुधारणा समितीची तहकूब सभा (मंगळवार दिनांक २०/११/२००७ रोजी तहकूब केलेली सभा ) मंगळवार दि. २७/११/२००७ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

सदर सभेत कार्यपत्रिका क्रंमाक २९, दि. २०/११/२००७ वरील विषय क्रं. ३०० ते ३३० चा विचार होईल.

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
शहर सुधारणा समिती
तहकूब सभा परिपत्र

शहर सुधारणा समितीची तहकूब सभा (मंगळवार दिनांक २०/११/२००७ रोजी तहकूब केलेली सभा ) मंगळवार दि. २७/११/२००७ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

सदर सभेत कार्यपत्रिका क्रंमाक २९, दि. २०/११/२००७ वरील विषय क्रं. ३०० ते ३३० चा विचार होईल.

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका

# पुणे महानगरपालिका
## शहर सुधारणा समिती
## कार्यपत्रिका क्मांक ३०

शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक ४/१२/२००७ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**विषय क्रं.३३१**

मा. शंकरराव बेलदरे पाटील, मा. महादेव बाबर व मा. सुनिल बनकर यांचे दि. १५/११/०७ चे पत्र.

वॉर्ड क्रं.१४४ मधील स.नं. ६५ संतोषनगर ते स.नं. ५५, अंजनीनगर यांना जोडणारा रस्ता कलम २०५ अन्वये आखणेत यावा.

**विषय क्रं. ३३२**

मा. शैलेंद्र नलावडे व मा. संजय नांदे यांचे दि. १५/११/०७ चे पत्र.

शिवशंकर सोसायटी, निलकमल सोसायटी, बिबवेवाडी यांचे आपण पुर्नवसन केले असून त्यांना फक्त ग्राऊड लेव्हलवरच बांधकाम परवानगी दिली आहे.

तरी घरातील लोकांची संख्या पाहता त्याठिकाणी ग्राऊड + १ ला बांधकाम परवानगी देण्यात यावी

**विषय क्रं.३३३**

मा. भिमराव तापकीर व मा. शिवराम मेंगडे यांचे दि. १७/११/०७ चे पत्र.

धनकवडी, आंबेगाव, दत्तनगर याठिकाणी डी.पी. व आर.पी. चे प्लॅन मध्ये दर्शविण्यात आलेले रस्ते आखून योग्य त्याप्रकारे खुणा करण्यात याव्यात.

**विषय क्रं.३३४**

मा. उज्वल केसकर यांचे दि. २१/११/०७ चे पत्र.

शहर सुधारणा समिती ठराव क्रं. २९९, दि. २०/११/०७ चा फेरविचार करण्यात यावा. (ज.ने.रा.श.पु.अ. व राष्ट्रकुल युवा स्पर्धाअंतर्गत रस्ते विषयक कामाचे र.रू. १४६२.९१ कोटीचे पूर्वगणणपत्रकास मान्यता देणेबाबत) मुख्यसभेची मान्यता मिळेल या भरवशावर अंमलबजावणी करू नये.

**विषय क्रं.३३५**

मा. शंकर केमसे व मा. संतोष फरांदे यांचे दि. २३/११/०७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ६१ वेदभवन येथील स.नं. ७८, डावी भुसारी कॉलनी कोथरूउ येथील ले-आऊट मधील चार ओपन स्पेस मधे पुढील प्रमाणे आरक्षण टाकण्यात यावे.

१) स.नं. ७८ मधील एरिया ५४ हजार स्क्वे.फुट येथे नागरिकांसाठी उद्यान.

२) स.नं. ७८ मधील एरिया ३१ हाजार स्क्वे.फुट येथे लहान मुलांसाठी उद्यान.

३) स.नं. ७८ मधील एरिया २५ हाजार स्क्वे.फुट येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, प्ले-ग्राऊंड

४) स.नं. ७८ मधील एरिया ३१ हाजार ७०० स्क्वे.फुट येथे अभ्यासिका व व्यायामशाळा.

**विषय क्रं.३३६**

मा. सौं.दिपाली ओसवाल यांचे दि. २६/११/०७ चे पत्र.

शहर सुधारणा समिती ठराव क्रं. २५९, दि. १६/१०/२००७ चा फेरविचार करण्यात यावा. (स.नं. ६५९,६६० बिबवेवाडी राजीव गांधी नगर हा भाग गवनि घोषित करावा.)

**विषय क्रं.३३७**

मा. सौं.रेखा टिंगरे यांचे दि. २७/११/०७ चे पत्र.

वॉर्ड क्रं.१ धानोरी येथील स.नं.८२ मुख्य रस्ता ते संकल्प नगरी गेट पर्यत ३० फुट रस्ता व संकल्पनगरी ते भोसले बंगला २० फुटी रस्ता २०५ अन्वये आखण्यात यावा.

**विषय क्रं.३३८**

मा. मुरलीधर मोहोळ व मा. सौं. स्वाती मोरे यांचे दि. २८/११/०७ चे पत्र.

भुसारी कॉलनी स.नं.७८ मधील अस्तित्वातील ले-आऊट मा.कलेक्टर यांनी रद्य केलेला आहे. सदर भूखंडावर विना परवाना बांधकाम होण्याची शक्यता आहे. म्हणून सदर ठिकाणी पुणे म.न.पा.चा डि.सी.रुल नुसार ताब्यातील ओपन स्पेस कायमठेऊन कार्यवाही करण्यांत यावी.

**विषय क्रं.३३९**

वॉर्ड क्रं. १६ आदर्श इंदिरनगर ही झोपडपट्टी दि. २६/२/१९८३ पासून गवनि घोषित असून येरवडा स.नं. ९२-९३ आदर्श इंदिरानगर येथील गार्डनचे आरक्षण रद्य करून स.नं. ९२, ९३ ही निवासी करणेबाबतचे मा. सुनिल गोगले व मा. अक्रुर कुदळे, अध्यक्ष विधी समिती यांचे दि. ११/९/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा ठराव क्रं. २३५, दि. २१/९/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/७३९, दि. १५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.३४०**

पुणे पेठ कोथरूड स.क्रं. ११२,१११ सुतारदरा या मिळकतीमध्ये कलम २०५ अन्वये रस्ता आखणी करणेबाबतचे मा. दिलीप उंबरकर, मा. पृथ्वीराज सुतार यांचे दि. २५/७/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १४६, दि. ३/८/०७. ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/नअ/७४०, दिनांक १५/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.३४१**

डायरेक्टर (झू) वर्ग -१ (तीन वर्षाचे समाधानकारक सेवेनंतर वे.श्रे. रू. १००००/- ते रू. १५२००/- + मोटार कार भत्ता ) एकवट वेतन दरमहा - प्रथम वर्षी रू. १००००/- व्दितीय वर्षी रू. ११०००/- तृतीय वर्षी १२०००/- या नव्याने निर्माण केलेल्या पदासाठी निवडयादीस मान्यता मिळणेबाबतचे मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/सहआ/से/७६४, दि. २१/११/०७ चे पत्र.

**विषय क्रं. ३४२**

महाराष्ट्र हौसिंग बोर्ड वसाहत येथे पाणीपुरवठा करण्यसाठी इ.एस.आर. बांधणेबाबतचे मा. बापूराव कर्णे गुरूजी, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती व मा. ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि. ३/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १५९, दि. १०/८/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/पापु/प्र/७७३, दिनांक २३/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ३४३**

बोपोडी सांगवी या गावांना जोडणा-या पुलाचे म.न.पा. हद्यीतील ॲप्रोच रस्त्याची आखणी कलम २०५ अन्वये करणेबाबत मा. श्रीकांत पाटील व मा. अनिल भोसले, सभागृह नेते यांचे दि. १६/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ७७, दि. २३/६/०७ तसेच मा. पथ विभागाचे जा.क्रं. पथ/४९५२, दि. १९/१०/०५ अन्वयेचे ॲप्रोच रस्ता आखणेबाबतचे पत्राला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/७७४, दिनांक २६/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.३४४**

पुणे पेठ औंध स.नं. १३८, हि.नं. १अ/२/२/२ या मिळकतीचे झोनिंग देणेबाबत मा. मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/७७५, दिनांक २६/११/०७चे पत्र.

**विषय क्रं.३४५**

पुणे शहरासाठीच्या पार्किंग व्यवस्थेच्या नियमावलीस मान्यता घेणोबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/७७७, दिनांक २७/११/०७ चे पत्र.

**विषय क्रं.३४६**

सि.स.क्रं.४३६ गुरुवार पेठ या मिळकतीवरील भाजी मंडईचे आरक्षण वगळणेबाबत.मा. मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/७७८, दिनांक २७/११/०७ चे पत्र.

**विषय क्रं.३४७**

पुणे मनपाच्या मध्यवर्ती कोठी कार्यालयाकडील इश्यु बिगारी,वर्ग-४ (वे.श्रे. रू. २७५०-५६९०/- ते मान्य भत्ते) मधील बढतीच्या पदावरिल निवडयादीबाबत. मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/सहआ/से/७८०, दि. २८/११/०७ चे पत्र.

**विषय क्रं.३४८**

पुणे मनपाच्या प्रशासनाचे पाणी पुरवठा कार्यालयाकडील गाळणी परिचर या हुद्याच्या जागा भरणेसाठी तयार केलेल्या निवड यादीस व निवडयादी वरिल सेवकांच्या नेमणुका करणेस मान्यता मिळणेबाबत. मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/सहआ/से/७८५, दि. २८/११/०७ चे पत्र.

**विषय क्रं.३४९**

पुणे पेठ येरवडा येथील नविन पुलामुळे येरवडा स.नं.५० येथील मिळकतीचा ॲप्रोच बंद झाल्याने मुंबई प्रांतिक म.न.पा.अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये रस्ता आखणे बाबत मा.गणेश बिडकर .मा.प्रा.विकास मठकरी .विरोधी पक्षनेते यांचे २७/७/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा ठ.क्रं.१४४,दि.२७/७/०७ मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ/नअ/७९१,दि.२९/११/२००७ ने पाठविलेला अभिप्राय.

**विषय क्रं.३५०**

मान्यविकास आराखडयातील क्रिडांगण,बाल क्रिडागंणे ,पार्क ,उद्यान या आरक्षणात बेसमेंट अनुज्ञेय करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ/नअ/६०९,दि.२/११/२००७ चे पत्र.

**विषय क्रं.३५१**

पुणे पेठ संगमवाडी येथील सादल बाबा दर्ग्याकडे जाणारा ३० मीटर रुंदीचा डि.पी.रस्त्याच्या प्रमाण रेषे मध्ये येणारी नागरिकांची घरे वाचविणेसाठी बदल करण्यात यावा.हा रस्ता दक्षिणेकडून ३० मी.स्थलांतरीत करणेत यावा यासाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वये गौंण फेरफाराची कार्यवाही सुरु करण्यात.मा.अनिल भोसले,सभागृहनेते .मा.प्रा.विकास मठकरी .विरोधी पक्षनेते मा.शाम देशपांडे यांचे १/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा ठ.क्रं.५६,दि.८/६/०७ मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ/नअ/ से/७०८,दि.७/११/२००७ ने पाठविलेला अभिप्राय.

**(टिप : विषय क्रं. ३५० व ३५१ चा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**

**शहर सुधारणा समिती ( खास सभा )**

**कार्यपत्रिका क्मांक ३१**

**शहर सुधारणा समितीची खास सभा गुरूवार दिनांक १३/१२/२००७ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**विषय क्रं.३५२**

पुणे शहरासाठीच्या पार्किंग व्वस्थेच्या नियमावलीस मान्यता घेणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/७७७, दिनांक २७/११/०७ चे पत्र.

**विषय क्रं.३५३**

मान्यविकास आराखडयातील क्रिडांगण,बाल क्रिडागंणे ,पार्क ,उद्यान या आरक्षणात बेसमेंट अनुज्ञेय करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ/नअ/६०९,दि.२/११/२००७ चे पत्र.

**विषय क्रं.३५४**

महात्मा फुले टि.पी.एस.क्रं. ३ फा. प्लॉट क्रं. २३१ सावित्रीबाई फुले स्मारकाचे बांधकाम करणे (दुसरा टप्पा) या कामाचे र.रू. १,६०,७१,९४१.०० चे पुर्वगणनपत्रकास मान्यता मिळणेबाबतचे मा. अति. महा. आयुक्त (वि) यांचे क्रं. मआ/भवन/८०२, दि. ३०/११/०७ चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**

**शहर सुधारणा समिती ( खास सभा )**

**कार्यपत्रिका क्मांक ३१**

**शहर सुधारणा समितीची खास सभा गुरूवार दिनांक १३/१२/२००७ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**विषय क्रं.३५२**

पुणे शहरासाठीच्या पार्किंग व्वस्थेच्या नियमावलीस मान्यता घेणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/७७७, दिनांक २७/११/०७ चे पत्र.

**विषय क्रं.३५३**

मान्यविकास आराखडयातील क्रिडांगण,बाल क्रिडागंणे ,पार्क ,उद्यान या आरक्षणात बेसमेंट अनुज्ञेय करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ/नअ/६०९,दि.२/११/२००७ चे पत्र.

**विषय क्रं.३५४**

महात्मा फुले टि.पी.एस.क्रं. ३ फा. प्लॉट क्रं. २३१ सावित्रीबाई फुले स्मारकाचे बांधकाम करणे (दुसरा टप्पा) या कामाचे र.रू. १,६०,७१,९४१.०० चे पुर्वगणनपत्रकास मान्यता मिळणेबाबतचे मा. अति. महा. आयुक्त (वि) यांचे क्रं. मआ/भवन/८०२, दि. ३०/११/०७ चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**
**शहर सुधारणा समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक ३२**

**शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक १८/१२/२००७ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**विषय क्रं.३५५**

मा. सुनिल गोगले व मा. बाळासाहेब कापरे यांचे दि. ३०/११/०७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. १६ फुलेनगर आळंदी रस्ता या संपूर्ण वॉर्डामध्ये महानगरपालिकेचे किंवा इतर कोणतेही भाजी मार्केट नसून तसेच या वॉर्डामध्ये भाजी मार्केटसाठी कोठेही आरक्षण नाही. संपूर्ण भागातील नागरिकांना भाजीपाला व जीवनाश्यक वस्तुंसाठी खडकी किंवा येरवडा याठिकाणी जावे लागते.

तरी स.नं. ९० (येरवडा) आळंदी रस्ता लगत भिक्षेकरी स्वीकार केंद्र (बेथस होम), येथे समाज कल्याणचे मोठे भूखंड असून या संपूर्ण जागेपैकी भाजी मार्केटसाठी जागा आक्षित करण्यात यावी.

**विषय क्रं.३५६**

मा. किरण बारटक्के यांचे दि. १/१२/०७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ११० मध्ये वारजे पॉप्युलरनगर याठिकाणी यशोदिप चौकाकडून संघर्षनगर हून पाण्याच्या टाकीकडे जाणारा रस्ता स.नं. ४५ हा रस्ता कलम २०५ अन्वये आखण्यात यावा.

**विषय क्रं.३५७**

मा. किरण बारटक्के यांचे दि. १/१२/०७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ११० मध्ये वारजे पॉप्युलरनगर याठिकाणी स.नं. ४४ मधून आदर्शनगर कडून ज्ञानेश सोसायटीच्या पाठीमागून संघर्षनगर कडे जाणारा रस्ता कलम २०५ अन्वये आखण्यात यावा.

**विषय क्रं.३५८**

मा. राजेंद्र काची व मा. सुनिल कांबळे यांचे दि. १/१२/०७ चे पत्र.

पुणे शहरातील रस्त्याच्या विकासाकरिता होणा-या कामाची आखणी, नियोजन व प्रत्यक्ष कामे करून घेण्याकरिता तज्ञ सल्लागारांची कमतरता भासत आहे.

मे. पेव्हटेक कन्सल्टंन्स यांचा पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारच्या कामांचा मोठा अनुभव आहे. तरी रस्त्याच्या कामांच्या योग्य नियोजन व आखणीच्या दृष्टीने मे. पेव्हटेक कन्सलटंट, पुणे यांचा पुणे महानगरपालिकेच्या तज्ञ सल्लागार समितीचे यादीमध्ये समावेश करण्यात यावा.

**विषय क्रं.३५९**

मा. संतोष फरांदे व मा. संजय नांदे यांचे दि. ३/१२/०७ चे पत्र.

शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ५८, दि. ८/६/२००७ चा फेरविचार करण्यात यावा. (आंबेगाव बु. मधील स.नं. ३१/१व ३१/२ येथील नागरिकांच्या हितासाठी पुर्व-पश्चिम असा कलम २०५ अन्वये ६ मीटर रस्ता आखण्याबाबत.)

**विषय क्रं.३६०**

मा. सौ. दिपाली ओसवाल, अध्यक्षा, महिला बाल कल्याण समिती व मा. सौ. सीमा सरदेशपांडे यांचे दि. ११/१२/०७ चे पत्र.

स.नं. ६५९,६६० राजीवगांधीनगर ही वस्ती झोपडपट्टी ग.व.नि. घोषित करणेबाबत सुचविलेले आहे. परंतु राजीवगांधीनगर येथील अस्तित्वातील घरे ही सन १९९० पासून असल्याने सदरील घरे गुंठेवारी कायद्यान्वये नियमित करण्यात यावी.

तसेच ग.व.नि. घोषित करणेचा ठराव रद्द करण्यात यावा.

<u>विषय क्रं.३६१</u>

पुणे पेठ घोरपडी गाव स.नं. ५०/१/३ क व ५०/१+३/४ रहिवाशांना जाण्यायेण्यांसाठी कलम २०५ अन्वये रस्ता आखणेबाबतचे मा. दत्तात्रय धनकवडे व मा. श्रीकांत पाटील यांचे दि. २९/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा ठराव क्रं. २०८, दि. ७/९/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/७९३, दि. २९/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

<u>विषय क्रं.३६२</u>

वॉर्ड क्रं. ४५ (विकास नगर, घोरपडी) येथील रस्ता सुरू करणेबाबतचे मा. सौ. मंगला मंत्री व मा. सौ. विद्या भोकरे यांचे दि. २९/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा ठराव क्रं. १००, दि. ६/७/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/७९४, दि. २९/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

<u>विषय क्रं.३६३</u>

पुणे सातारा रस्त्यावरील शंकर महाराज मठ ते भारती विद्यापीठ येथील उड्डाण पूलाबाबतचे मा. दत्तात्रय धनकवडे व मा. श्रीकांत पाटील यांचे दि. ६/७/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा ठराव क्रं. १११, दि. १३/७/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/वानि/८०३, दि. ३०/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

<u>विषय क्रं.३६४</u>

पुणे सातारा रस्त्यावर जुना जकात नाक्याजवळील कोंढवा-दत्तनगर हा भुयारी मार्ग तयार करणेबाबतचे मा. शंकरराव बेलदरे पाटील व मा. सुनिल टिंगरे व मा. ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि. ३/८/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा ठराव क्रं. १५८, दि. १०/८/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/वानि/८०४, दि. ३०/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

<u>विषय क्रं.३६५</u>

पुणे पेठ वानवडी स.नं. २६ व २७ या नागरी वस्तीतील गार्डनचे आरक्षण रद्य करून सदरचा भाग निवासी झोन मध्ये समाविष्ट करणेबाबतचे मा. अभिजित शिवरकर, मा. शैलेन्द्र नलावडे व मा. प्रसन्न जगताप यांचे दि. २१/६/०७ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा ठराव क्रं. २५४, दि. ३/१०/०७ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/८०५, दि. ३०/११/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

<u>विषय क्रं.३६६</u>

पुणे महानगरपालिका हद्यीतून जाणा-या सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ते पुणे महानगरपालिकेस हस्तांतरित करणेबाबतचे मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/पथ/वानि/८०६, दि. ३०/११/०७ चे पत्र.

<u>विषय क्रं.३६७</u>

पुणे मनपाच्या विविध विभागाकडे गवंडी वर्ग -४ (एकवट वेतन दरमहा प्रथम वर्ष रू. २९००/-, व्दितीय वर्ष ३४००/-, तृतीय वर्ष ३९००/- व तीन वर्षाचे समाधानकारक सेवेनंतर समय वेतनश्रेणी रू. २९५५ ते ५९६० +मान्य भत्ते) या पदावरील नेमणूकीबाबतचे मा.अति. महापालिका आयुक्त(ज)यांचे क्रं.अमआ (ज)/सहमआ/ नअसे/८३२, दि. ६/१२/०७ चे पत्र.

**विषय क्रं.३६८**
पुणे पेठ कोथरूड स.नं. १२३, १२४ मधील १२.० मी. डी.पी रस्ता कलम ३७ अन्वये रद्य करणेबाबतचे मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/८७९,दि. १२/१२/०७ चे पत्र.

**विषय क्रं.३६९**
मनपा प्रशासनाकडील कनिष्ठ (मेकॅनिकल) (वेतनश्रेणी रूपये ५,५०० ते ९००० + मान्य भत्ते) या हुद्याची प्रतिक्षा यादी तयार करणेबाबतचे मा. महा. आयुक्त यांचे क्रं. मआ/सहमआ/से/८५३, दि. ७/१२/०७ च्या पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. १२८६, दि. १४/१२/०७ चा विचारासाठी.

**विषय क्रं.३७०**
पुणे शहरासाठीच्या पार्किंग व्यवस्थेच्या नियमावलीस मान्यता घेणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/७७७, दिनांक २७/११/०७ चे पत्र.

**विषय क्रं.३७१**
सि.स.क्रं.४३६ गुरुवार पेठ या मिळकतीवरील भाजी मंडईचे आरक्षण वगळणेबाबत.मा. मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/७७८, दिनांक २७/११/०७ चे पत्र.

**विषय क्रं.३७२**
पुणे मनपाच्या प्रशासनाचे पाणी पुरवठा कार्यालयाकडील गाळणी परिचर या हुद्याच्या जागा भरणेसाठी तयार केलेल्या निवड यादीस व निवडयादी वरिल सेवकांच्या नेमणुका करणेस मान्यता मिळणेबाबत. मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/सहआ/से/७८५, दि. २८/११/०७ चे पत्र.

**(टिप विषय क्रं. ३७१ व ३७२ चा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते. )**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**